**निवडणुकीच्या दिवशी मतदान केंद्र व आजूबाजूच्या परिसरात उमेदवारांचा प्रवेश व निवडणूक काळात उमेदवाराने उघडावयाची प्रचार कार्यालये**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- ९ मे, २००७.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, उमेदवारांना मतदान केंद्रात प्रवेश करण्याची जी मुभा देण्यात आली आहे त्याचा गैरवापर केला जातो. यामध्ये मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात उमेदवाराने स्वतःची ओळख करुन देणे किंवा मतदारांना नमस्कार करणे किंवा मतदान केंद्रात वाजवीपेक्षा जास्त वेळ थांबणे याचा समावेश होतो. मतदारांना ओळख करुन देणे किंवा नमस्कार करणे हे प्रकार निश्चितच प्रचारामध्ये मोडतात. तसेच वाजवीपेक्षा जास्त वेळ मतदान केंद्रात थांबणे हा प्रकारदेखील मतदार व निवडणूक यंत्रणा यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न असतो. असे प्रकार टाळण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला अशा सूचना देण्यात याव्यात की, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात त्याने कोणत्याही व्यक्तीला स्वतःची ओळख करुन देऊ नये अथवा कोणालाही नमस्कार करु नये किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा प्रचार करु नये. तसेच मतदान केंद्रात प्रवेश केल्यानंतर मतदान प्रक्रियेचे निरीक्षण दोन ते तीन मतदारांचे मतदान होईपर्यंतच करावे. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारांस पोलिसांकरवी त्या क्षेत्राच्या बाहेर काढावे.

२. उमेदवारांना किती प्रचार कार्यालये काढण्याची परवानगी असेल अशीही विचारणा काही निवडणूक अधिकाऱ्यांकडून होत असते, त्यासाठी असे आदेश देण्यात येत आहे की, १५ लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक प्रभागांसाठी उमेदवारास एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल. १५ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रत्येक प्रभागात दोन प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल. जिल्हा परिषद मतदार गट व पंचायत समिती मतदार गण यामध्ये येणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रासाठी एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल. ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये प्रत्येक प्रभागासाठी उमेदवाराला एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व पोलिस आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा पोलिस अधिक्षक,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab-१२२.doc